प्रश्न → मराठीच्या उत्पत्तीकाळाविषयी थोडक्यात माहिती द्या. (ऑक्टो 2002) किंवा

* मराठी भाषेचा उत्पत्तीकाळ निश्चित करणारी साधने कोणती ? चर्चा करा. (मार्च - 2002)

* मराठी भाषेतील शिलालेख कोणते ते सांगा. (मार्च 2003)

→ प्रस्तावना —

महाराष्ट्रात ज्या काही भाषा बोलल्या जातात त्या सर्व भाषेत मराठी भाषा लोकप्रिय असलेली दिसून येते. मातृभाषा म्हणून आपण मराठी भाषेचा स्वीकार केला. असा मराठीतील सर्वात जुन्या ग्रंथाचा शोध लावून आपल्याला घालता येणार नाही. तसे पाहिले तर मुकुंदराजांनी लिहिलेला 'विवेकसिंधु' हा ग्रंथ मराठीतील पहिला ग्रंथ म्हणून ओळखला जातो यापूर्वी मराठीत ग्रंथ लिहिले असतील, परंतु ते उपलब्ध नसल्यामुळे हाच ग्रंथ आद्य पद्य ग्रंथ म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रात बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेचा उत्पत्तीकाळ ठरविण्यासाठी ताम्रपट व शिलालेख या साधनांचा अभ्यास करावा लागतो.

* प्राचीन ताम्रपट —

मराठी भाषेचा उत्पत्तीकाल ठरविण्यासाठी उपलब्ध पुराव्यापैकी जुन्यात जुन्या अशा पुराव्यांचा शोध घ्यावा लागतो. हे पुरावे ताम्रपटाच्या माध्यमातून मिळतात. ताम्रपटाच्या साधनाद्वारे मराठीचा उत्पत्तीकाळ श. 602 (इ.स. 680) पर्यंत आपल्याला नेता येतो. इ.स. 680 च्या जो ताम्रपट आहे. त्या ताम्रपटावर पन्नास, सोळाव्या, पिथिवी यासारखे शब्द आढळतात. इ.स. 699 च्या चिकुर्डे येथील ताम्रपटात करुन, करित यासारखे मराठी शब्द लिखित स्वरुपात आढळतात. शके 735 च्या ताम्रपटात येत्र (यत्र) हा

735
78
813

* अक्षी येथील शिलालेख शके ९३४ । आतापर्यंत सापडलेल्या सर्व शिलालेखांत सर्वात जुना शिलालेख आहे; परंतु आतापर्यंत भतण.. येथील शिलालेखाचा काळ शके ९०५ असा अनुमानाने ठरला गेल्यामुळे तोच आद्य शिलालेख असे समजले जात असे; परंतु, श्रवण. येथील शिलालेख शके 1039 मधील असल्याचे आता साधार सिद्ध झाल्याने आद्य शिलालेखाचा मान सध्यातरी अक्षीच्या शिलालेखाकडे जातो.

शब्द आढळतो. (शके ९३२ च्या शिलालेखात वइरी (वैरी) निशेष (नि:शेष) यासारखे शब्द आहेत).

## * मराठी भाषेतील शिलालेख —

प्राचीन काळात शिलालेखाला अनन्यसाधारण असे महत्त्व होते. शिलालेख हे प्राचीन काळात अक्षर वाङ्मय म्हणून ओळखले जात असत. अशा या शिलालेखावर प्राचीन काळात कोणते शब्द/वाक्य कोरलेले होते ते आपल्याला पुढील प्रमाणे पाहता येईल.

*(इ.स. ७७९ च्या तालुक्याच्या शिलालेखात हित, सुक्त, वावाची असे मराठी शब्द सापडतात.)

इ.स. शके ९३४ (१०१२) अक्षी येथील शिलालेखात मराठी वाक्य सुस्पष्ट स्वरूपात आढळते. म्हणूनच आतापर्यंत सापडलेल्या शिलालेखात हा सर्वात जुना शिलालेख म्हणून ओळखला जातो.) शके 1038 (इ.स. 1116) मधील कर्नाटक राज्यातील म्हैसूर च्या श्रवणबेळगोळच्या शिलालेखात "श्री चामुण्डराये करवियले गंगराजे सुत्ताले करवियले" हे मराठीतील पहिले लिखित वाक्य. राममल्ल राज्याच्या कारकिर्दीत प्रचंड अशा गोमटेश्वराच्या मूर्तीखाली चामुण्डराय या पुरुषाने हा लेख कोरला असल्याचे अभ्यासकांनी सांगितले. (गंगनरेश भावलाजाचा तट उभारला, प्रधानाने कोरला. चामुण्डरायाने)

(पाळपाच वस्ती भाग.) अंबेजोगाई येथील खोलेश्वराच्या शिलालेखात शके 1150 मध्ये काही संस्कृत ओळी व त्याचे मराठीकरण सापडले. इ.स. 1206 मध्ये पाटण येथील भवानी मंदिरातील श. 1128 शिलालेखात मोविले, कोहिरिला, माप इत्यादी तत्कालीन मराठीतील शब्द सापडतात. तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथील शिलालेखात इ.स. 1164 मध्ये मास, पुती यासारखे तत्कालीन मराठीचे विशेष दर्शविणारे शब्द आढळले आहेत.

जुन्याकाळी पहिले वाक्य सर्वप्रथम सांगितले प्रा. डि. कुलकर्णी
अक्षीच्या शिलालेखात १०० वर्ष जुना आहे — डॉ. ... के
* श्री चामुण्डराये करवियले वाक्य शके ९०५ मध्ये कोरले

Scanned with CamScanner

* शके 1211 मधील उनकेश्वराच्या शिलालेख या शिलालेखावर सुमारे 18 ओळी कोरल्या आहेत. सोमदेव, रामचंद्रदेव यादव अशा प्रकारचा उल्लेख. 6)

परंतु याशिवाय शके 1109 (इ.स. 1187) च्या शिलालेखात संस्कृतला संस्कृत मजकूर व शेवटी मराठीत शापवचन दिलेले आहे यातरून आपल्याला हे लक्षात येते की त्याकाळी संस्कृत ही शिष्टसंमत भाषा होती. परंतु जनसामान्यांची भाषा म्हणून ज्ञान मराठीस स्थान असल्याचे दिसून येते.

शके 1211 (इ.स. 1289) मध्ये रामचंद्रदेव यादव यांच्या काळात उनकेश्वरच्या शिलालेखात सरणु नायक, सोमदेव पंडित, सरण नायक असे काही शब्द या शिलालेखातील ओळीत आढळतात.

## सारांश —

~~ताम्रपट~~ व मराठीच्या उत्पत्तीकालाच्या साधनांचा म्हणजेच ताम्रपट व शिलालेखांचा विचार करता असे दिसून येते की, इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या सुरुवातीस मराठी भाषा जन्मास आली असे आपण म्हणू शकतो. ढोबळपणे मराठीचे मौखिक रूप सातव्या शतकात शब्दरूपाने आढळते. नवव्या शतकात (शिलालेखाद्वारे) वाक्यरूपाने आढळते आणि बाराव्या शतकात ती ग्रंथाच्या दालनात पदार्पण करताना आढळून येते. ~~ढोबळ~~ या सर्व विवेचनावरून इसवी सनाच्या सातव्या शतकाचा उत्तर हा मराठीचा जन्मकाळ आपण निश्चित करू शकतो.

ताम्रपटाचा आधार घेऊन.

## * संदर्भ —


1) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास → डॉ. ल.रा. नसिराबादकर
2) के सागर उत्तरपत्रिका कुंजी सेट / नोट → प्रा. निशा भंडारी / प्रा. गंगा भंडारी.


* पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील शिलालेखावर काही देणगीदारांची नावे आहेत. या शिलालेखावरून आपल्याला आजवरचे शके 14 वर्षापर्यंत मागे जाता येते. (टिपा पान 8)